शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर.
स्त्री शस्त्रक्रियागार विभागासाठी (ओ.टी.) नविन
वातानुकूलीत यंत्र खरेदीस मंजुरी मिळण्याबाबत.
(रु. ६३,०६६/-)

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्र. आयुष-२०१८/प्र.क्र.२५/१८/आयु-२
गो.ते.रुग्णालय आवार, ९ वा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- १८ एप्रिल, २०१८

वाचा :- शासन निर्णय क्रमांक एडीआर २०१६/प्र.क्र.७२/१६/आयु २, दिनांक ०५.०८.२०१७.

प्रस्तावना :-

आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाचे अधिपत्याखालील शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर येथील रुग्णालयाचे स्त्री शस्त्रक्रियागार विभागातील (ओ.टी.) वातानुकूलीत यंत्राला १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने सद्यस्थिती यंत्र नादुरुस्त असून सदर यंत्राचे सुटे भाग बाजारात मिळत नसल्यामुळे व यंत्र दुरुस्त करता येत नाही. त्यामुळे नवीन वातानुकूलीत यंत्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत), नागपूर यांचे कडून खरेदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर स्त्री शस्त्रक्रियागार विभागात नविन वातानुकूलीत यंत्र शासनविहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुनच खरेदी करण्याकरीता रु.६३,०६६/- (त्रेसष्ठ हजार सहासष्ट फक्त) इतक्या रकमेस खाली नमूद मुद्दयांच्या अनुषंगाने शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) उक्त वाचा येथील शासन निर्णयामधील अ.क्र.१८ नियम क्र.६८ मधील अटींच्या अधिन राहून तसेच संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांचे प्राधिकार संपुष्टात आल्याने अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर यांना स्त्री शस्त्रक्रियागार विभागासाठी (ओ.टी.) नवीन वातानुकूलीत यंत्र खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्याचे अधिकार शासनाकडे आहेत.
२) सदर अंदाजपत्रकात ४ % आकस्मिक खर्च, ८ % इतर चार्जेस इत्यादी योग्य तरतूद केल्या आहेत.

सदर खरेदीसाठी येणारा खर्च वित्तीय वर्ष सन २०१८-१९ अंतर्गत खालील नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली मंजूर होणाऱ्या निधीतून भागविण्यात यावा.

प्रधान लेखा शीर्ष	-	२२१० -	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
		०२ -	नागरी आरोग्य सेवा - इतर वैद्यक पध्दती
		१०१ -	आयुर्वेद
		(०२)(०२)	आयुर्वेदिक आणि युनानी मुफसल रुग्णालये आणि दवाखाने
		५२	यंत्रसामुग्री व साधन सामग्री. (२२१० १९०१)

प्रशासकीय मान्यता असलेला सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५१/इमा-३ दिनांक २०/०१/२०१८ अन्वये प्राप्त सहमती च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४२११४५४३७८११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Dhananjay Mahesh Nayak
Date: 2018.04.23 11:09:16 +05'30'

(ध.म.नायक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर.
३) महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) महालेखापाल-१, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) कार्यकारी अभियंता, नागपूर विद्युत विभाग, नागपूर
६) कोषागार अधिकारी, नागपूर
७) कक्ष अधिकारी, अलेप, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड नस्ती (आयु-२).